पोलीस कार्यालय भडगांव जि. जळगांव

प्रेस नोट

भडगांव पोलीस स्टेशन
दिनांक १६/०७/२०२५

प्रती,

मा. संपादक सो।

- - - - - - - - - - - - - - - - - -

**जबरी चोरी करणारे चोरांकडुन ३७,०००/- रुपये किं.चा मुद्देमाल हस्तगत**

दिनांक ०४/०७/२०२५ रोजी सायकाळी ०७.४५ कजगांव गावाचे आधी अंदाजे २ किलोमीटर अंतरावर गोडगांव रोडवर सार्व. जागी. यातील फिर्यादी नामे विक्की विटोबा पाटील, वय - २४ वर्ष, धंदा - नोकरी, रा - भालगांव बु. ता - एंरडोल, जि - जळगांव हा ईटसईड बँक लिमिटेड भारत फायनान्स कंपनीत फिल्ड असिस्टंट मॅनेजर म्हणुन नोकरीला असुन तो सदर दिवशी ग्रामीण भागातुन कर्जाचे हप्ते रिकव्हरी करुन त्याचे मोटार सायकल ने पथराड येथुन गोंडगांव मार्ग चाळीसगांव येथे ऑफीसला जात असताना फिर्यादीचे पाठीमागुन जोरात आवाज आला असता तो दचकला व कोणी आवाज दिला हे बघण्यासाठी फिर्यादीने त्याची मोटार सायकल थांबवित असतांना फिर्यादीचे मागुन एक बजाज प्लाटीना मोटारसायकलवर दोन अनोळखी इसम रुमाल बांधुन आले व त्यांनी त्यास शिवीगाळ करुन फिर्यादीचे मोटार सायकल ला लाथ मारली त्यामुळे फिर्यादी हे खाली पडले असता त्यांची मोटार सायकलची चावी काढुन रोडचे बाजुला फेकुन फिर्यादीस शिवीगाळ करुन फिर्यादीच्या पाटीला अडकवलेली बॅग त्यात असलेले ५८,४००/- रु. रोख रक्कम, ५०००/- रु कि.चा सॅमसंग कंपनीचा टॅब, व २०००/- रु की चे access कंपनीचे बायोमॅट्रीक मशीन असा एकुण ६५४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरदस्तीने हिसकावुन घेवुन पळुन गेले वैगेरे म।। चे फिर्याद वरुन भडगाव पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर नं. २६०/२०२५ बी.एन.एस. ३०९(४), ३५२,(३)(५) प्रमाणे फिर्यादी यांचे फिर्याद वरुन दोन अज्ञांत आरोपी विरुध्द गुन्हा रजि. दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास हा पो.उपनिरी. सुशील सोनवणे यांचे कडेस देण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास हा मा.पोलीस अधिक्षक माहेश्वर रेड्डी सो, जळगाव, मा.अपर पोलीस अधिक्षक सौ. कविता नेरकर चाळीसगाव परिमंडळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विनायक कोते सो, चाळीसगांव उपविभाग यांचे सुचना व मार्गदर्शना नुसार सदर गुन्ह्याचा तपास करीत असतांना फिर्यादी हा वापरत असलेला टॅब चे लास्ट लोकेशन बाबत माहीती घेतली असता ते बांबरुड प्र.ब.ता. भडगाव रोडाला येत असल्याने तेथे जावुन तेथुन माहीती प्राप्त केली. याबाबत आणखी माहीती घेता सदर गुन्हा पथराड गावातील काही तरुणांनी केल्याची माहीती तांत्रिक विश्लेषण करुन मिळाली त्यावरुन संशईत म्हणुन गोपाल संजय पारधी वय-३२ वर्ष रा. पथराड ता.भडगाव यास त्याचे गावातुन त्यास ताब्यात येवुन पोलीस स्टेशनला घेवुन आलोत. त्याचेकडे गुन्ह्याबाबत कसोशीने विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा हा त्याचे इतर साथीदारासोबत केल्याचे कबुली दिल्याने सदर आरोपीस दि.१२/०७/२०२५ रोजी २३.३५ वा. अटक करण्यात आली. तसेच सदर आरोपी हा अटकेत असतांना त्याचे गुन्हा करतेवेळी अजुन कोणी साथीदार होते काय याबाबत त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने त्यांचे नावे मयुर ज्ञानेश्वर साळुंखे, अतुल नाना पाटील, कैलास वाल्मिक पाटील सर्व रा. पथराड ता. भडगाव असे सांगितले. तसेच गुन्ह्यातील इतर आरोपी यांची गोपनिय माहीती काढुन आरोपी क्रं. २ मयुर ज्ञानेश्वर साळुंखे रा. पथराड ता. भडगाव यास त्याचे गावातुन ताब्यात घेतले. व त्यास देखील गुन्ह्यातबाबत विचारपुस करुन त्याने देखील वरील साथीदारांसोबत गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने त्यास दि.१३/०७/२०२५ रोजी २०.५८ वा. अटक केली आहे. त्यानंतर सदर गुन्ह्यातील इतर दोन फरार आरोपी अतुल नाना पाटील, कैलास वाल्मिक पाटील दोघे रा. पथराड ता. भडगाव यांचे बाबत माहीती काढुन सदर गुन्ह्यातील आरोपी अतुल नाना पाटील, कैलास वाल्मिक पाटील दोघे रा. पथराड ता. भडगाव अशांना गुन्ह्याचे तपासकामी गावातुन ताब्यात घेतले. सदर आरोपीकडे देखील गुन्ह्याबाबत विचारपुस केला असता त्यांनी देखील गुन्ह्याची कबुली दिलेली असल्याने त्यांना गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी नामे **१) गोपाल संजय पारधी वय-३२ वर्ष ( यास दि.१२/०७/२०२५ रोजी २३.३५ वा. अटक) २) मयुर ज्ञानेश्वर साळुंखे,वय-२२ वर्ष (यास १३/०७/२०२५ रोजी २०.५८ वा. अटक ) ३) अतुल नाना पाटील,वय-२६ वर्ष ४) कैलास वाल्मिक पाटील वय-२७ वर्ष (आरोपी क्रं. ३ व ४ यांना दि.१४/०७/२०२५ रोजी २०.२७ वा. अटक ) सर्व रा. पथराड ता. भडगाव यांना अटक करण्यात आली आहे.** सदर गुन्ह्यात आणखी आरोपी असण्याची शक्यता असुन त्या दृष्टीने तपास चालु आहे.

सदर आरोपी कडुन गुन्ह्यात खालील वर्णनाचा व किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

| अ.क्रं. | जप्त मुद्देमालाचे वर्णन |
|---|---|
| १ | २०००/- रु. कि.एक बायोमॅट्रिक मशिन अर्धवट जळालेल त्यास अंदाजे दिड फुट लांबीच वायर जु.वा.कि.अ. |
| २ | ००.००/- रु. कि. चा अर्धवट जळालेले कागदपत्रांचा गठ्ठा |
| ३ | ५०००/- रु. कि.चा एक राखाडी रंगाचा सॅमसंग कंपनीचा टॅब जु.वा.कि.अ. |
| ४ | १०,०००/- रु. कि.ची एक बजाज कंपनीची काळ्या रंगाची लाल पट्ट्याची डिझाईन असलेली प्लॅटीना मोटारसायकल तिचा क्रं. एम.एच. ५४ ए.-८५५१ अशी असलेली जु.वा.कि.अ. |
| ५ | १०,०००/-रु.कि.ची एक हिरा कंपनीची स्पेल्डर प्लस काळ्या रंगाची मोटारसायकल तिचा क्रं. एम.एच. ५४ ए. ७३७५ अशी असलेली.जु.वा.कि.अ.<br>( आरोपी मयुर ज्ञानेश्वर सांळुखे याने गुन्हा करतेवेळी वापरलेली) |
| ६ | १०,०००/- रुपये रोख आरोपी नामे अतुल नाना पाटील याने निवदेन दिल्याने जप्ती पंचनामा करुन जप्त. |
| **एकुण - ३७,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल.** | |

सदरची कामगिरी मा.पोलीस अधिक्षक माहेश्वर रेड्डी सो, जळगाव, मा.अपर पोलीस अधिक्षक सो. कविता नेरकर चाळीसगाव परिमंडळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विनायक कोते सो, अमळनेर उपविभाग (अति.प्रभारी चाळीसगांव उपविभाग) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री पांडुरंग पवार, पो.उपनिरी. सुशील सोनवणे, पोहेकाँ/५६२ किशोर सोनवणे, पोहेकाँ/२८८० निलेश भालचंद्र ब्राम्हणकर, पोकाँ/१९३२ प्रविण परदेशी, पोकाँ/१६७६ सुनिल जयसिंग राजपुत, पोकाँ/१५३७ संदीप सोनवणे यांनी केली असुन गुन्हाचा पुढील तपास पो.उपनिरी. सुशील सोनवणे हे करीत आहेत.

कळावे,

पांडुरंग विठ्ठल पवार
पोलीस निरीक्षक
भडगाव पोलीस स्टेशन


महाराष्ट्र पोलीस
भडगांव पोलीस स्टेशन
भडगांव, जि. जळगांव
फोन : २१३३३३
MH19D T3955
भडगांव पोलीस स्टेशन